# जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम

नवीन इमारत जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम तळमजला, हॉल क्रमांक ०५, वाशिम
फोन नंबर (०७२५२) २३१४५५ Email : dlsawashim@gmail.com

## जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम मार्फत विधि स्वयंसेवकांची (Paralegal Volunteers) निवडीकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.

मा. राष्ट्रीय विधि सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या विधि स्वयंसेवक योजनेअंतर्गत जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, वाशिम येथे ५० विधि स्वयंसेवकांची तसेच तालुका विधि सेवा समिती मंगरूळपीर, कारंजा, रिसोड, मालेगाव, मानोरा येथे प्रत्येकी २५ विधि स्वयंसेवकांची एक वर्षाकरिता निवड करावयाची आहे. करिता वाशिम जिल्हयातील रहिवासी असलेल्या महिला/पुरुष नागरिकांकडुन अर्ज खालील अटींवर मागविण्यात येत आहेत.

१) मा. महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यानी दिलेल्या नियमानुसार विधि स्वयंसेवक यांना प्राधिकरणाकडून दिलेल्या कामाबाबत, त्यांनी दिलेल्या सेवेचे नियमाप्रमाणे व जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम/तालुका विधि सेवा समीती(संबंधीत) यानी दिलेल्या आदेशा प्रमाणे ज्या दिवशी काम केले फक्त त्या दिवशीचेच मानधन अनुज्ञेय राहील. त्यांना मानधनाशिवाय कोणत्याही प्रकारचे वेतन, मोबदला अथवा मजुरी देण्यात येणार नाही.

२) विधि स्वयंसेवक म्हणून सेवा देण्यास इच्छुक असलेल्या वाशिम जिल्हयातील शिक्षक व सेवानिवृत्त शिक्षक, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी, वरिष्ठ नागरिक, समाजकार्याचे शिक्षण घेणारे विद्यार्थी व शिक्षक, अंगणवाडी कार्यकर्ती, डॉक्टर्स, विधि महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी, सेवा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे/महामंडळांचे अराजकीय सदस्य, स्वयं मदत/बचत गटातील किंवा महिलांच्या इतर गटातील महिला /इच्छुक साक्षर नागरिक ज्यांचे नावे कोणत्याही प्रकराच्या फौजदारी गुन्हयांची नोंद नाही, अशा व्यक्ती, सामाजिक कार्य करण्यास इच्छुक नागरिकांना अर्ज सादर करता येतील.

३) अर्जदार व त्याच्या रक्ततील नातेवाईकावर दिवाणी/फौजदारी न्यायालयात वाशिम जिल्हयात प्रकरण चालु किंवा प्रलंवीत नसावेत. कोणत्याही प्रकराचे प्रकरण प्रलंबीत नसल्याबाबचे हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) नियुक्ती नंतर विधि स्वयंसेवक याच्यावर व रक्ताच्या नातेवाईकावर दिवाणी तसेच फौजदारी प्रकरण वाशिम जिल्हयातील कोणत्याही न्यायालयात दाखल झाल्यास त्याबाबत जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम या कार्यालयास सुचना देण्याची जबाबतदारी विधि स्वंयसेवकाची राहील. सुचना न दिल्यास होणाऱ्या कार्यवाहीस पात्र राहील.

५) विधि स्वंयसेवक करीता अर्ज जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, कार्यालय, वाशिम येथून निशुल्क प्राप्त करावेत किंवा सोबतच्या नमुण्यामध्ये अर्ज सादर करावेत.

६) आलेल्या अर्जातुन चाळणीद्वारे उमेदवारास मुलाखतीस बोलविण्याचे अधिकार समिती राखुन ठेवत आहे.

७) अर्जदाराचे वय १८ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त असावे.

८) अर्जदाराने त्याचा फोटो, शैक्षणिक दस्तऐवज, रहिवासी प्रमाणपत्र, संपर्क क्रमांक, तसेच जिल्हा स्तरावर किंवा तालुका स्तरावर मंगरूळपीर/कारंजा/रिसोड/मालेगाव/मानोरा येथे सेवा देण्यास इच्छुक आहे. असे स्पष्ट लिहिलेले परिचय पत्र सहित अर्ज मा. अध्यक्ष, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम यांचे नावे जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय नवीन इमारत, तळमजला हॉल क्रमांक ०५, वाशिम येथे दिनांक ३१/१२/२०२२ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत किंवा त्याआधी प्रत्यक्ष सादर करावेत. **ई-मेलद्वारे तसेच पोस्टाद्वारे प्राप्त झालेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाही**. याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

९) अर्जदार वाशिम जिल्हयातील रहिवासी असणे आवश्यक आहे.

विधि स्वयंसेवकांच्या पात्रतेसंबंधी, तसेच योजनेच्या सविस्तर माहितीकरिता **www.nalsa.gov.in** या संकेतस्थळावर जाऊन त्यामधील **Act Rules** या मेनुमधील **Preventive & Strategic Legal Services Scheme** मधील **Scheme for Para Legal Volunteers** या योजनेवरील सविस्तर माहिती पहावी.

# जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम

अंतर्गत तालुका विधि सेवा समिती (संबंधित तालुक्याचे नाव लिहावे)

अद्यावत फोटो

| | | |
|---|---|---|
| ०१ | संपुर्ण नांव | |
| ०२ | संपुर्ण स्थायी पत्ता | |
| ०३ | मोबाईल क्रमांक (व्हॉटसॲप नंबर असणे आवश्यक) | |
| ०४ | ईमेल आय.डी (असणे आवश्यक) | |
| ०५ | शैक्षणीक पात्रता | |
| ०६ | जन्मतारीख | |
| ०७ | संस्था/सामाजीक संस्थेचे/राजकीय पक्ष यांचे सभासद आहात काय? असल्यास तशी माहिती. | |
| ०८ | आपले किंवा आपले स्वःताचे नातेवाईका विरुध्द फौजदारी गुन्हा किंवा दिवाणी प्रकरण वाशिम जिल्हयातील न्यायालयात दाखल किंवा प्रलंबीत आहे का? असल्यास त्याचा तपशिल. | |
| ०९ | विधिस्वयंसेवक (PLV) म्हणुन जिल्हा विधि सेवा प्राधिकरण वेळोवेळी ठरवेल त्या मानधनावर काम करण्यास तयार आहे, जिल्हास्तरावर, तालुका स्तरावर | |
| १० | याआधी विधिस्वयंसेवक म्हणुन काम केले आहे का? | |
| ११ | सामाजीक कार्य अनुभव थोडक्यात माहिती. | |

## घोषणा (Declaration)

मी याद्वारे जाहीर करतो/करते की, वर नमुद संपुर्ण माहिती बरोबर असुन ती चुकीची/खोटी आढळुन आल्यास विधिस्वयंसेवक म्हणुन माझी नियुक्ती झाल्यास ती रद्द होण्यास पात्र ठरेल. व मी विधि सेवा प्राधिकरण, वाशिम या कार्यालयाच्या सर्व सूचना मा. जिल्हा न्यायालय, वाशिम यांच्या संकेतस्थळावर वाचुनच अर्ज केला आहे.

वाशिम.

दि.    /    /२०

सही

संपुर्ण नाव :-

संबंधी सर्व कागदपत्रे सोबत जोडण्यात यावीत

# जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम

नविन इमारत जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम, तळमजला, हॉल क्रमांक ०५ पिन ४४४५०५
ई — मेल :— dlsawashim@gmail.com फोन नंबर :— ०७२५२२३१४५५


---

जिल्हा विधि सेवा प्राधिकरण, वाशिम येथे ५० विधि स्वयंसेवक तसेच तालुका विधि सेवा समिती मंगरुळपीर, मालेगाव, मानोरा, कारंजा व रिसोड येथे प्रत्येकी २५ विधि स्वंयसेवकांची एक वर्षाकरीता मा. महाराष्ट्र राज्य विधि सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे नियमानुसार ज्या दिवशी काम केले त्या दिवशीच्या मानधनावर नियुक्ती करावयाची आहे.

त्याबद्दलची संपुर्ण माहीती, अटी, शर्ती व अर्जाचा नमुना पाहण्यासाठी मा. जिल्हा न्यायालय, वाशिम यांची वेबसाईट https://districts.ecourts.gov.in/washim वर भेट द्यावी.

अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख दिनांक ३१/१२/२०२२ रोजी सायंकाळी ५:३० पर्यंत अधिक्षक, जिल्हा विधि सेवा प्राधिकरण यांचेकडे प्रत्यक्षरित्या सादर करावे.

स्वा/-
सचिव
जिल्हा विधि सेवा प्राधिकरण,
वाशिम.

दिनांक १४/१२/२०२२